विकसित महाराष्ट्र-२०४७ अंतर्गत दि. ०१ एप्रिल, २०२६ ते दि. ३१ मार्च, २०३० या ४ वर्षांच्या कालावधीसाठी राज्यात १०० सबसर्किट घोषित करण्यासाठी व्याख्या, निकष व कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
शासन परिपत्रक क्र.टीडीएस २०२६/०८/प्र.क्र.१२१/पर्यटन-१,
दिनांक : ०१ सप्टेंबर, २०२६

प्रस्तावना :-

१) भारत सरकारकडून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला सन २०४७ पर्यंत “विकसित भारत २०४७” करण्याचा संकल्प आहे. या दृष्टीने महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविणे हे राज्याचे मुख्य ध्येय आहे. राज्याच्या ध्येयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने तसेच प्रत्येक क्षेत्राचा ठसा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर उमटावा यासाठी विकसित महाराष्ट्र-२०४७ व्हिजन डॉक्युमेंट जाहीर करण्यात आले आहे.

२) “विकसित महाराष्ट्र-२०४७” कृती आराखड्यानुसार पर्यटन विभागामार्फत पुढील पाच प्रमुख उपक्रम निश्चित करण्यात आले आहेत :-

- आठ पर्यटन विषयांच्या आधारे पाच पर्यटन परिपथाचा विकास करणे.
- परिपथांचा सर्वसमावेशक विकास सुनिश्चित करण्यासाठी Destination Management Organizations (DMO) स्थापन करणे.
- पर्यटन पायाभूत सुविधांमध्ये खाजगी गुंतवणूक आकर्षित करणे.
- महाराष्ट्राची जागतिक पर्यटन ओळख प्रस्थापित करण्यासाठी जागतिक ब्रँडिंग मोहीम राबविणे.
- पर्यटन माहिती परिसंस्थेचे डिजिटायझेशन व विकास करणे.

३) राज्यातील पर्यटन स्थळांचे नियोजन, पायाभूत सुविधांचा विकास, सेवा पुरवठा, पर्यटक व्यवस्थापन आणि पर्यटन गुंतवणुकीचे नियोजन व अंमलबजावणी या १०० Tourist Sub-circuit च्या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने, पर्यटन स्थळांचे विषयाधारित, भौगोलिकदृष्ट्या सुसंगत व परस्परपूरक पर्यटन उत्पादनांमध्ये एकत्रीकरण करून पर्यटकांचा मुक्काम कालावधी, पर्यटनावरील खर्च तसेच स्थानिक स्तरावरील रोजगारनिर्मिती वाढविण्याच्या दृष्टीने पर्यटन सर्किटचा विकास करणे आवश्यक आहे.

४) त्यानुषंगाने, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटन सर्किट संकल्पनांचा अभ्यास करण्यात आला. यामध्ये विशेषतः स्वदेश दर्शन १.० अंतर्गत परिभाषित पर्यटन सर्किटांची संकल्पना, फिलिपाईन्स प्रजासत्ताकाच्या राष्ट्रीय पर्यटन विकास आराखडा (२०२३-२०२८) मधील सर्किटची व्याख्या तसेच जपानच्या गोल्डन रूट आणि स्कॉटलंडच्या नॉर्थ कोस्ट ५०० यांसारख्या यशस्वी पर्यटन सर्किट मॉडेल्सचे परीक्षण करण्यात आले. सदर अभ्यासाच्या आधारे, विकसित महाराष्ट्र-२०४७ या मोहिमेंतर्गत पर्यटन विभागामार्फत दि.०१.०४.२०२६ ते ३१.०३.२०३० या कालावधीत राज्यात टप्प्याटप्प्याने एकूण १०० सबसर्किट्स विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.

त्यानुसार, सबसर्किट्सची निवड, घोषणा व विकास प्रक्रिया एकसमान, पारदर्शक आणि परिणामकारक पद्धतीने राबविण्यासाठी सर्किट व सबसर्किट यांची व्याख्या तसेच त्यांच्यासाठी आवश्यक निकष निश्चित करणे आवश्यक होते. त्यामुळे, विभागामार्फत सर्किट व सबसर्किट घोषित करण्यासाठी आवश्यक व्याख्या, निकष व त्यासंबंधीची कार्यपद्धती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन परिपत्रक :-</u>

विकसित महाराष्ट्र-२०४७ या मोहिमेंतर्गत पर्यटन विभागामार्फत दि.०१.०४.२०२६ ते दि.३१.०३.२०३० या चार वर्षांच्या कालावधीसाठी निर्माण करावयाच्या १०० सबसर्किटच्या अनुषंगाने सर्किट व सबसर्किट घोषित करण्यासाठी व्याख्या व निकषांबाबत खालीलप्रमाणे कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे:-

१. पर्यटन सर्किट व सबसर्किटची व्याख्या :-

अ) **पर्यटन सर्किट :-** "पर्यटन सर्किट" म्हणजे विविध सबसर्किटचा समावेश असलेला, परस्पर-संलग्न व व्यापक पर्यटन अनुभव उपलब्ध करून देणारा नियोजित पर्यटन मार्ग होय. अशा पर्यटन सर्किटमध्ये किमान तीन प्रमुख पर्यटनस्थळांचा समावेश असणे आवश्यक राहील. सदर पर्यटन सर्किट एका जिल्ह्यापुरते किंवा विभागापुरते मर्यादित असू शकेल अथवा एकापेक्षा अधिक जिल्हे किंवा विभागांमध्ये विस्तारलेले असू शकेल. सर्किटमधील पर्यटनस्थळांमधील अंतर पर्यटकांच्या प्रवासाच्या दृष्टीने सुसंगत व व्यवहार्य असणे आवश्यक राहील. प्रत्येक पर्यटन सर्किटसाठी स्पष्ट प्रवेश बिंदू (Entry Point) व निर्गमन बिंदू (Exit Point) निश्चित असणे आवश्यक राहील. तसेच, प्रत्येक पर्यटन सर्किटमध्ये किमान एक प्रमुख वाहतूक केंद्र असणे आवश्यक राहील. सर्किटमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व पर्यटनस्थळांना भेट देण्यासाठी पर्यटकांना प्रवृत्त करणारी सुसंगत रचना व समग्र पर्यटन अनुभव (Tourist Experience) उपलब्ध असणे अपेक्षित राहील.

ब) **पर्यटन सबसर्किट :-** पर्यटन सबसर्किट" म्हणजे पर्यटन सर्किटचा मूलभूत घटक असून, भौगोलिकदृष्ट्या परस्पर जोडलेली व पर्यटकांच्या प्रवासाच्या दृष्टीने सुसंगत अंतरावर स्थित असलेल्या पर्यटनस्थळांचा नियोजित समूह होय. अशा सबसर्किटमध्ये एक किंवा अधिक प्रमुख पर्यटनस्थळे (Anchor Destinations) तसेच त्यांच्याशी संबंधित दुय्यम पर्यटन आकर्षणांचा समावेश असेल. पर्यटन सबसर्किट हे एका जिल्ह्यापुरते किंवा लगतच्या जिल्ह्यांमध्ये विस्तारलेले असू शकेल. सबसर्किटमधील पर्यटनस्थळांमधील अंतर पर्यटकांच्या प्रवासाच्या दृष्टीने सुसंगत व व्यवहार्य असणे आवश्यक राहील. प्रत्येक पर्यटन सबसर्किटसाठी स्पष्ट प्रवेश बिंदू (Entry Point) व निर्गमन बिंदू (Exit Point) निश्चित असणे आवश्यक राहील. तसेच, प्रत्येक पर्यटन सबसर्किटमध्ये किमान एक प्रमुख वाहतूक केंद्र असणे आवश्यक राहील. सबसर्किटमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व पर्यटनस्थळांना भेट देण्यासाठी पर्यटकांना प्रवृत्त करणारी सुसंगत रचना व समग्र पर्यटन अनुभव (Tourist Experience) उपलब्ध असणे अपेक्षित राहील.

२. पर्यटन सर्किट व सबसर्किटचे घटक :-

i. **पर्यटन आकर्षणे :-** पर्यटन आकर्षणे हे पर्यटन सर्किटचे मूलभूत घटक असून ते प्रवासाचे प्रमुख प्रेरक आहेत. पर्यटन सर्किटमध्ये किमान एक किंवा अधिक प्रमुख (Anchor) स्थळे व त्यांच्याशी संबंधित दुय्यम पर्यटन आकर्षणांचा समावेश असेल.

ii. **दळणवळण सुविधा :-** कार्यक्षम दळणवळण व्यवस्था ही पर्यटन सर्किटच्या विकासाचा मूलभूत आधार असल्याने सर्किटमधील सर्व पर्यटनस्थळे रस्ते, रेल्वे, हवाई, जलमार्ग किंवा बहुविध वाहतूक प्रणालीच्या माध्यमातून जोडलेली असावीत.

iii. **पर्यटन प्रवास आणि मुक्कामाचा कालावधी :-** पर्यटन सर्किटची आखणी पर्यटकांना अनेक पर्यटनस्थळांचा अनुभव घेण्यासाठी प्रवृत्त करणारी, सरासरी मुक्काम कालावधी वाढविणारी, तसेच पर्यटन आकर्षणांची संख्या, विविधता व स्थानिक वितरण यानुसार सर्किटांची रचना १-२ रात्री, २-३ रात्री किंवा ३-५ रात्रींच्या पर्यटन प्रवासासाठी सक्षम असावी.

iv. **निवास व्यवस्था आणि पर्यटन पायाभूत सुविधा :-**

- पर्यटन सर्किटमध्ये हॉटेल्स, रिसॉर्ट्स, होमस्टे, अतिथीगृहे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (MTDC) मालकीची सुविधा केंद्रे, तसेच कॅम्पसाईट्स यांसारख्या पुरेशा निवास सुविधांचा आधार असणे आवश्यक आहे.
- पर्यटकांना आरामदायी व निरंतर पर्यटनांचा अनुभव घेण्यासाठी आवश्यक मुलभूत सुविधा, पर्यटन सेवा, वाहतूक सुविधा, भोजन व्यवस्था, मनोरंजन सुविधा इ. सुविधा उपलब्ध असाव्यात.

V. **वैद्यकीय, सुरक्षा आणि डिजिटल पायाभूत सुविधा :-** प्रत्येक पर्यटन सर्किटमध्ये खालील सुविधा असणे आवश्यक आहे :-

- आरोग्य सुविधा.
- आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्था.
- पोलीस सहाय्य यंत्रणा.
- पर्यटक पोलीस.
- निरीक्षण प्रणाली.
- मोबाइल जोडणी.
- इंटरनेट सुविधा.
- डिजिटल माहिती प्रणाली.
- आंतरराष्ट्रीय दर्जाची आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक पर्यटनस्थळे विकसित करण्यासाठी नमूद पायाभूत सुविधांची उपलब्धता.


३. **पर्यटन सबसर्किट निश्चितीचे निकष :-** पर्यटन सबसर्किट निश्चिती करतांना उच्च पर्यटन क्षमता, महत्त्व आणि पर्यटकांना आकर्षित करण्याची क्षमता असलेल्या विद्यमान पर्यटन स्थळे व आकर्षणांना प्राधान्यक्रम देण्यात येईल. त्यामध्ये प्रामुख्याने खालील घटकांचा समावेश असेल:-

- युनेस्को (UNESCO) मान्यताप्राप्त जागतिक वारसा स्थळे
- भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (Archaeological Survey of India -ASI) व राज्य पुरातत्व विभागाद्वारे संरक्षित ऐतिहासिक स्मारके व पुरातत्त्वीय स्थळे.
- राज्यातील राष्ट्रीय उद्याने, प्रमुख वन्यजीव अभयारण्ये व संरक्षित नैसर्गिक क्षेत्रे
- राष्ट्रीय व प्रादेशिक महत्त्वाची धार्मिक व आध्यात्मिक स्थळे (उदा.ज्योतिर्लिंगे, अष्टविनायक मंदिरे, शक्तिपीठे, गुरुद्वारे, पारशी, ज्यू तसेच तत्सम तीर्थक्षेत्रांचा समावेश असेल)


- कुंभमेळा तसेच मोठ्या प्रमाणावर पर्यटकांना आकर्षित करणारे इतर प्रमुख धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक संमेलने.
- कृषी पर्यटन, कॅराव्हॅन पर्यटन, साहसी पर्यटन, आदिवासी पर्यटन, अमूर्त सांस्कृतिक वारसा (ICH) पर्यटन तसेच इतर उदयोन्मुख पर्यटन क्षेत्रांसारखी विशिष्ट (Niche) पर्यटनस्थळे व अनुभवांचा समावेश करण्यात येईल.
- पर्यटन मंत्रालय, भारत सरकार, पर्यटन विभाग, इतर शासकीय विभाग, संस्था किंवा प्राधिकरणांमार्फत राबविण्यात आलेल्या, पूर्ण झालेल्या, प्रगतिपथावर असलेल्या तसेच प्रस्तावित पर्यटन प्रकल्पांचा यामध्ये समावेश करण्यात येईल.
- निश्चित करण्यात येणारे पर्यटन सबसर्किट हे विकसित महाराष्ट्र-२०४७ या मोहिमेंतर्गत पर्यटन आराखड्यात प्रस्तावित आठही पर्यटन विषयांचा समतोल व पुरेसा समावेश सुनिश्चित करतील.
- पर्यटन सर्किट निश्चित करताना, वरील निकषांसोबतच पर्यटन विभाग एखाद्या स्थळाची पर्यटन क्षमता, विद्यमान तसेच अपेक्षित पर्यटकांची संख्या, दळणवळण सुविधा, पर्यटन पायाभूत संरचना, पर्यटनस्थळांचा विकास, गुंतवणूक क्षमता, शाश्वत पर्यटन अनुषंगिक बाबी आणि समग्र पर्यटन अनुभव निर्माण करण्याची क्षमता या घटकांचाही विचार करेल.

४. **पर्यटन सर्किट मॉडेल्स** :- नियोजन व विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील पर्यटन सर्किटची रचना खालीलपैकी कोणत्याही एका प्रारूपाप्रमाणे (मॉडेलप्रमाणे) असू शकेल :-

अ) **कॉरिडॉर-आधारित मॉडेल** :- कॉरिडर-आधारित पर्यटन सर्किट हे एका सलग मार्गिकेवर आधारित असते, जे अनेक गंतव्यस्थळांना क्रमवार पद्धतीने जोडते. हे सर्किट सामान्यतः महामार्ग, रेल्वे मार्गिका किंवा किनारी मार्ग यांसारख्या प्रमुख वाहतूक मार्गिकेच्या आधारे विकसित केले जाते. पर्यटक सामान्यतः या मार्गिकेवरून एका पर्यटनस्थळापासून दुसऱ्या पर्यटनस्थळाकडे प्रवास करताना त्या मार्गावरील विविध पर्यटन आकर्षणांचा अनुभव घेतात. विस्तृत रेषीय भौगोलिक क्षेत्रामध्ये एका विशिष्ट दिशेने पसरलेल्या पर्यटन आकर्षणांच्या मालिकेसाठी हे मॉडेल उपयुक्त ठरते. (उदा. जपान गोल्डन रुट)



ब) **हब-अँड-स्पोक मॉडेल** :- हब-अँड-स्पोक मॉडेलनुसार, एक प्रमुख पर्यटन केंद्र किंवा वाहतूक केंद्र हे पर्यटकांसाठी मुख्य आधार केंद्र म्हणून कार्य करते. पर्यटक मुख्य केंद्राच्या आसपासच्या क्षेत्रात असलेल्या जवळील पर्यटन आकर्षणांना अल्पकालीन भेटी देतात व पुन्हा मुख्य केंद्रस्थळी परत येतात. हे मॉडेल जिथे प्रमुख शहरी केंद्र, धार्मिक तीर्थस्थळ, विमानतळ शहर किंवा पर्यटन प्रवेश केंद्राभोवती विविध पर्यटन आकर्षणांचे समूह विकसित झालेले आहेत अशा पर्यटन पर्यटनस्थळांसाठी योग्य ठरते. (उदा. नॉर्थ कोस्ट ५००, स्कॉटलंड)



क) **संमिश्र (हायब्रिड) मॉडेल :-** संमिश्र पर्यटन सर्किट म्हणजे कॉरिडॉर-आधारित व हब-अँड-स्पोक मॉडेलच्या यांच्या मिश्रणातून तयार झालेले सर्किट.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९०११११५५४१४४५० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SANJAY JAGANNATH KHANDARE
Date: 2026.09.01 11:58:38 +05'30'

(संजय जगन्नाथ खंदारे)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभाग) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ विभाग) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
७. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
९. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१०. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
११. मा.लोकसभा/राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
१२. मा.विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
१३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१४. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१५. अपर मुख्य सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
१७. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
१९. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
२०. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२२. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
२३. निवडनस्ती (पर्यटन-१)

***